REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2019

# स्वातंत्र सेनानी राष्ट्र संत तुकडोजी महाराज

प्राचार्य, डॉ. अण्णासाहेब म्हळसने
विदर्भ महाविद्यालय, बुलडाणा.

**प्रस्तावना :**



अमरावती जिल्हयात यावली या गावी माणिक व मंजुळाबाई ठाकुर यांचे पोटी नररत्न तुकडोजी यांचा जन्म १९०९ साली झाला. 'घरी दारिद्र्याचे वरदान ! परिभावभक्तीचे नसे वान! ऐकत सुसंस्काराचे गाण ! सोशित वाढलो!' असे स्वत:च्या दारिद्र्यात घलविलेल्या बालपणाचे वर्णन त्यांनी स्वत:च केले आहे. राष्ट्रसंतांनी देशवासियांप्रती समृध्दीचे स्वप्न पाहीले, तसे प्रयत्न केले व त्यासाठीच आयुष्य वेचले. लोकांना कृतीप्रवण करतांना लोकसंघटन केले. कारण ते आधुनिक मुल्ये जपणारे सुंस्कृतीपुरूष होते. प्राचिन अर्थाने निवृत्तीवादी, ध्यान, पुजा, भक्ती यामध्येच गुंतून राहणारे संत नव्हते तर समाजाने सत्प्रवृत्ती जोपासून आधुनिकता स्विकारावी असा प्रयत्न करणारे व देशकार्यात स्वत: भाग घेवून लोकांना प्रवृत्त करणारे देशभक्त संत होते. स्वातंत्र्यप्राप्तीच्या लढ्याचे तुकडोजी महाराज केवळ साक्षीदार नसून क्रियाशील प्रवक्ते होते. हाती खंजेरी घेवून राष्ट्रसंतांनी ब्रिटीशांविरोधात समाजमन जागृत केले त्यासाठी देशभ्रमण केले.

भारतीय स्वतंत्र्य आंदोलनात १९३० हे वर्ष महत्वाचे आहे. महात्मा गांधीजींनी १९२० च्या असहकार आंदोलनानंतर प्रथमच देशव्यापी लढा— सविनय कायदेभंगाच्या रुपाने यावर्षी प्रारंभ केला. हजारो — लाखो भारतीयांनी देशभरातून प्रतिसाद दिला. या आंदोलनात राष्ट्रसंतांनी प्राण ओतला त्यांनी सामाजिक व राष्ट्रीय पुनरुत्थानाच्या कार्यक्रमात हिरहिरीने भाग घेतला. जनतेने स्वयंस्फुर्त होण्यासाठी त्यांची तशी मनोभूमिका तयार करण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. अमरावती जिल्ह्यात जन्मलेल्या राष्ट्रसंतांची कर्मभूमि विदर्भ व महाराष्ट्रभरच नव्हे तर देशभरात होती. खंजेरी वाद्याच्या तालावर सर्वसामान्य माणसापर्यंत केवळ अमरावती जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण विदर्भामध्ये राष्ट्रीय जागृतीचा संदेश त्यांनी पोचविला. [१] विदर्भातील जंगलसत्याग्रहात जनसामान्यांना समजेल अशा सोप्या भाषेतील भजनांमधून राष्ट्रीय संकटाची जाणीव त्यांनी करून दिली होती चिमूर व आष्टी येथिल प्रसिध्द आंदोलनात जान फुंकण्याचे कार्य राष्ट्रराष्ट्रसंतांनी केले. तेथिल शिबीरार्थीसमोर म. गांधीजींच्या तत्वांचा भजनांमधून प्रचार केला. त्यांच्या हृदयापासून झिरपलेल्या अंभंगवाणीने चिमूरच्या सत्याग्रहींच्या हृदयाचा ठाव घेतला. चिमूर येथे उच्चारलेल्या भजनवाणीने पुर्ण आसमंत निनादून गेला होता.[२] महाराजांच्या संदेशाने परीसर भारावून गेला आणि चिमूर, वरोरा, चंप्रपूर परिसरात देशभक्तीचा महापूर आला. या राष्ट्रकार्यासाठी संघटन महत्वाचे असल्याचे ते सांगतात. त्यांच्या अंतरिच्या कला जाणणरा व जागृत करणाऱ्या तुकडोजींनी ''तोडो पंथको नाना ! सब संघ बनालो अपना! [३] अशा प्रकारे आंदोलनाची पायाभरणी करण्यासाठी आवश्यक साधनसामुग्रीची राष्ट्रसंतांना जाणीव असल्याचे यावरुन स्पष्ट होते. या जाणीवेला त्यांच्या खंजेरी भजनांची जोड देवून

सामान्यांना आंदोलनाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य महाराजांनी कळकळ व तळमळ ओतून केल्याचे स्पष्ट होते.

राष्ट्रसंतांनी १९३० प्रमाणेच १९४२ च्या चलेजाव आंदोलनातही महत्वाची भूमिका बजावली होती, ८ ऑगष्ट १९४२ ला राष्ट्रीय सभेने 'चलेजाव' चा ठराव पास केल्यानंतर देशभर आंदोलनाचा वणवा पेटला. चलेजाव च्या घोषणांनी देशदुमदुमला सर्वत्र देशभक्तीला उधाण आले. आपली कर्मभूमी मोझरी (गुरूकुंज) व नागठाणा येथिल आश्रमात ग्रामिण तरुणांच्या प्रशीक्षणासाठी राष्ट्रसंतांनी चार्तुमास घेतले. त्यांनी राष्ट्रीय स्वराज्य संघ, भारत सेवादल, कुस्तीगिरांचे आखाडे अशा संस्थंमध्ये जावून '' जाग उठो बलवीरो, अब तुम्हारी बारी है'' म्हणून ललकारी दिली. १९४१ मध्ये युवकांना स्वतंत्र राष्ट्रधर्म शिक्षण वर्गाच्या माध्यमातून देशभक्तीची दिक्षा दिली. प्रतिदिवशी कित्येक हजार लोकांना आपल्या प्रभावी भाजनातून आणि भाषणातून राष्ट्रीयतेची दिक्षा देवून महाराजांनी १९४२ च्या स्वातंत्र्य संग्रामात अपूर्व रंग भरला [४] चले जाव आंदोलन काळात त्यांच्या भजनांनी सामान्य जनता पेटून उठली. आंदोलनासाठी विशेष भजन जनसागराची देशभ्क्तीभावना पेटविणारे ठरले ते पुढीलप्रमाणे '' अब काहे को धूम मचाते हो, दुखवाकर भारत सारे! जाते है नाथ हमारे! झाड झडुल्ले शस्त्र बनेंगे, भक्त बनेगी सेना ! पत्थर सारे बम बनेंगे, नांव लगेगी किनारे''! त्यांची ही भजने सर्वतोमुखी पोचली होती [५] राष्ट्रसंतांच्या या भजनांची ब्रिटिश शासनाने धास्ती घेतली होती. चिमूर येथील पोलीस दलांसोबतच लोकांचा संघर्ष या गितानेच घडून आल्याचे सरकारचे मत बनले होते. आंदोलनादरम्यान राष्ट्रसंतांनी आष्टी (वर्धा जिल्हा) येथे जावून अनेक सहकारी जमवून तेथील पोलीस ठाण्यावर सत्याग्रहाची योजना आखली १६ ऑगस्टला मोठ्या जमावाने महाराजांची भजने गात सत्याग्रह केला. गोळीबार होवूनही जमावाने पोलीस स्टेशनवर तिरंगा फडकविण्याचे काम प्राणाची बाजी लावून केले होते. यावरुन राष्ट्रसंतांच्या भजनांचा प्रभाव व त्यांचेवरील जनतेची श्रध्दा स्पष्ट होते.

असेच आंदोलन चिमूर (चंद्रपूर जिल्हा) येथेही घडून आले. राष्ट्रसंतांच्या भजनांच्या जाहीर कार्यक्रमाव्दारे पेटलेल्या जनतेने प्रभातफेरीमध्ये भजने म्हटली. या गितगायनाने सत्याग्रहींचे रक्त खवळून गुलामीच्या बेड्या तोडून टाकण्यासी त्यांनी प्राणाची बाजी लावली. महाराजांच्या गीतांतील श्ब्दांनी क्रांती केल्याचा प्रत्यय येथे आला. त्यामुळे येथील लोकांनी स्वातंत्र्यचळवळीत दिलेला साहसी लढा स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात सुवर्णक्षराने लिहीला जातो [६] राष्ट्रसंतांनी त्यांचे जन्मगांव यावली येथे व परीसरातही जनजागृती घडवून आणली. त्यांच्या आरती मंडळाचे कार्यकर्ते सक्रीय होते.

अशा प्रकारे राष्ट्रसंतांच्या क्रांतीकारी भजनांनी चिमूर, आष्टी, यावली, बेनोडा या विदर्भ परिसरात प्रचंड जनरोष सरकारविरोधात उभा केला. सरकारने त्यांच्या भजनाची धस्ती घेतली होती. संपूर्ण विदर्भभर त्यांच्या प्रभावाने जनसागर पेटून उठला होता. इंग्रज सत्तेविरूध्द लोकांमध्ये देशभक्तीची ज्योत प्रज्वलीत करून त्यांचे प्रक्षोभक भजनामुळे इंग्रजविरोधात चिथावणी मिळाली व लोक हिंसाचाराकडे वळाले, या आरोपाखली महाराजांना सरकारने २१ ऑगष्ट १९४२ ला राजबंदी म्हणून अटक केली. या अटकेचे तिव्र पडसाद सर्वत्र उमटले. सर्वत्र त्यांच्या सुटकेसाठी मागणी होवू लागली. नागपुरचे हरकरे यांनी डॉ. ना. भ. खरे व टी. जे. केदार यांच्याकडे जावून महाराजांच्या सुटकेसाठी प्रयत्न करण्याची विनंती केल्यावरून डॉ. खरे व केदार हे वऱ्हाड व मध्यप्रांताचे गव्हर्नर सर हेन्री व्हिनॅम यांचेकडे रदबदली करण्यास गेले होते. आंदोलना दरम्यान राष्ट्रसंतांच्या सुटकेसाठी जनरेटावाढू लागला. शेवटीसरकारने ३ डिसेंबर १९४२ रोजी त्यांची सुटका केली.

सारांश म्हणजे राष्ट्रसंतांनी केवळ आपल्या जन्मस्थळी यावली वा अमरावती जिल्ह्यात नव्हे तर पूर्वविदर्भ (चिमूर, आष्टी) आणि वऱ्हाडातील आपल्या क्रांती भजनांव्दारे जनमानस ढवळून काढले होते. स्वातंत्र्य आंदोलन त्यांच्या प्रभावाने गतिमान झाले. आंदोलनकर्ते पोलीसांशी भिडले प्राणची बाजी लावणारे देशभक्त राष्ट्रसंतांनी निर्माण केले. प्रचंड ताकदीच्या ब्रिटिश शासनाला महाराजांची धास्ती वाटली. म्हणून अटक व शेवटी सुटका असा उपद्व्यास इंग्रजांना करावा लागला. राजसत्तेला धर्मसत्तेने टक्कर देणारा महात्मा म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज होय लोकसंघटनातून देश घडविणारा महान संत म्हणून तुकडोजी असामान्य ठरले.

## संदर्भ सुची

1 Joshi, Dr. P. L. Edi – political Ideas and leadership in id Vidarbha, Dept. of political Science & Public administration, Nagpur University, 1980, Page 289
२ सावरकर, सुदामजी जिवनयोगी खंड ३ पृ. २२६
३ तिडके, डॉ. श्रीकांत—ऐसी कळवळयाची जाती, मधील लेख— राष्ट्रसंत तुकडोजी आधुनिक परिप्रेक्ष्य, प्रका. प्रा. घनश्याम दरणे, यवतमाळ २००१ पृ. १९१
४ सावरकर, सुदामजी संपा. तुकडोजी महाराज —ग्रामगिता पृ. ५३
५ तिडके डॉ. श्रीकांत पुर्वोक्त पृ १९०, १९३
६ वैद्य, डॉ. सुमन, कोठेकर डॉ. शांता—आधुनिक भारताचा इतिहास, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, सचिवालय, मुंबई, १९८५ पृ. १०९
७ Khare, N. B. My Political Memories or Autoiography. pul J.R. Joshi, utiwada, sitauldi, Nagpur, Page 191, 192